**सं. फौ.ख.क्र. ९४३/२००८**
**सरकार वि. राजेश**
नि. क्र. २०

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ५ ची शपथेवर जबानी</u>**

माझे नांवः – संजय केशवराव गायकवाड

अंदाजे वयः – ४६ वर्षे, व्यवसाय– खाजगी नोकरी

राहणारः – गोरेवाडा, ता. जि. नागपुर.

**<u>उलटतपास आरोपीचे विधिज्ञ श्री. के.एन. मोहिले यांच्यामार्फत</u>**

२. घटना घडली त्यावेळेस मी घरी होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटना मी प्रत्यक्ष डोळयाने पाहिली नाही त्यामुळे कशी घटना घडली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे कोणत्या वाहनांचा अपघात झाला हे मला सांगता येणार नाही. मला कळमेश्वर पोलीस स्टेशनमधून फोन आला होता. पोलिसांनी बयान घेतल्याचे मला आठवत नाही. माझ्याकडे त्यावेळी फोन नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस स्टेशनमधून मला फोन आल्याचे मी खोटे सांगत आहे. माझे शिक्षण बारावीपर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या भावाला दवाखान्यात नेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी कळमेश्वर दवाखान्यात गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या भावाला दवाखान्यात घेवून गेलो हे मी खोटे कथन केले आहे. दवाखान्यात नेलेल्या गाडीचा क्रमांक माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्या गाडीने धडक दिली त्या गाडीचा क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला गाडीची सिरीज व रंग सांगता येणार नाही. मी पोलिसांना बयान देताना गाडीचा क्रमांक एम.एच.३१/बी.व्ही. ५४७० सांगितला होता. परंतु आता मला माझे बयान दाखविण्यात आले. त्यामध्ये बी.व्ही. नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, या वाहनाने माझ्या भावाचा अपघात झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी काल्पनिक नंबर व काल्पनिक गोष्ट तयार करुन पोलिसांना खोटे बयान दिले. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेले सर्व खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, बी.व्ही. या वाहनाचा या घटनेशी कोणताही संबंध नाही व आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सं. फौ.ख.क्र. ९४३/२००८**
**सरकार वि. राजेश**
नि. क्र. २०

**उलट तपास पूर्ण**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

स्वा/-

ठिकाणः कळमेश्वर

(आर. एल. राठोड)

**दि. ०३.११.२०२५**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी, कळमेश्वर

**सं. फौ.ख.क्र. ९४३/२००८**
**सरकार वि. राजेश**
नि. क्र. २०

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हे मुळ साक्षपुराव्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – आर.एम. परमाल (नि.श्रे.)